"अंतरी पेटवू ज्ञानज्योत"

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव – ४२५ ००१.

* परिपत्रक क्रमांक ९५ /१९९२ *

विषय :– बी.एड्. व एम्.एड्. अभ्यासक्रमांतील दुरुस्ती.

विद्यापीठ अभ्यास मंडळाच्या निर्णयानुसार सर्व संबंधितांच्या माहितीसाठी कळविण्यात येते की :–

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न असलेल्या बी.एड्.महाविद्यालयातील शैक्षणिक शास्त्राच्या व मुल्यमापन व प्रशासनच्या अंतर्गत येणा–या अभ्यासक्रमामध्ये सोबत जोडल्याप्रमाणे काही बदल व दुरुस्त्या करण्यात आल्या असून प्रश्नपत्रिकेचा आराखडा व गुणांची विभागणी देखील सोबत जोडण्यात आली आहे.

शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे मा.प्राचार्य यांना विनंती की, त्यांनी या परिपत्रकाचा आशय तसेच सोबत सूचित केलेल्या दुरुस्त्या व प्रश्नपत्रिकांचा आराखडा इत्यादि संबंधिची माहिती सर्व संबंधित प्राध्यापकांच्या नजरेस आणावी ही विनंती.

जा.क्र. बी.एड्./अभ्यासक्रम/९२/६/२५/१०२६२
दिनांक : ५ ऑक्टोबर, १९९२
जळगाव.

सहाय्यक कुलसचिव

प्रत माहितीसाठी सादर रवाना :–

[१] मा.अधिष्ठाता, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,

[२] मा.संलग्न शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे मा.प्राचार्य,

[३] मा.बी.एड्. अभ्यास मंडळाचे सर्व सदस्य,

[४] मा.कुलसचिव, उमवि., जळगाव.

[५] मा.उपकुलसचिव, परीक्षा विभाग, उमवि.,जळगाव.

[६] मा.सहा.कुलसचिव, परीक्षा विभाग, उमवि.,जळगाव.

[७] मा.कक्षाधिकारी, रेकॉर्ड विभाग, उमवि., जळगाव.

.....

निगुसो/५१०९२.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव-४२५ ००१.

शैक्षणिक शिक्षणशास्त्र अभ्यास मंडळ

बी.एड. व एम.एड. च्या अभ्यासक्रमात किरकोळ दुरुस्त्या :-

बी.एड. [जनरल] च्या पाठ्यक्रम १ मध्ये खालील दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत.

Unit 1 (b) वगळण्यात यावा.
Unit 2 (a) मध्ये " Castes, sub-castes and their post ancient effects" घालावे.
Unit 2 (b) वगळण्यात यावे.
Unit 3 (c) मधील " Tradition and Modernity " वगळण्यात यावे.
Unit 3 (d) " School as a Social Institution " असा असावा.
3 (d) चा 3 (e) 3 (e) चा 3 (f) असा बदल करावा.

एम.एड. पाठ्यक्रमामध्ये पुढील बदल करण्यात आले आहेत.

पाठ्यक्रम १ मध्ये Unit-4 संपूर्ण वगळण्यात यावे. Unit 9 'Futurology and Education' Unit- 4 च्या जागी घालावे.

Unit No. 3.3 वगळण्यात यावे.
पुस्तकांच्या यादीमध्ये ३१ भविष्याभास आणि शिक्षण : प्रा. बी. बी. पंडित समाविष्ट करण्यात यावे.

वैकल्पिक पाठ्यक्रम B-2 " Co-oparative study of Educational systems in SARK Countries" ऐवजी "Co-oparative study of Educational systems in U.S.A. & China ." असे घालावे

तसेच पाठ्यक्रम B-2 मध्ये USSR ऐवजी China करावे.

वैकल्पिक पाठ्यक्रम 'Environmental Education ' मध्ये खालील आशय घालण्यात यावा.

1.1.1 Nature and Scope - Scientific, dynamic, interdisciplinary, and purpose of environmental Science.
2.2.5. Measures and Remedies to conpol pollation.
2.2.6. Global Problems : Ecological digration, Acid Rain, Depletion of Ozon layer and Rise in Atmospheric temprature".

बी.एड. व एम.एड. परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांचा ढाचा [Format ] पुढील प्रमाणे राहील.

बी.एड. परीक्षेच्या, प्रत्येक पाठ्यक्रमासाठी प्रश्नपत्रिकेचा ढाचा खालील प्रमाणे राहील.

**विभाग-१ : १ ते ४ घटक**

| प्रश्नक्रमांक | | गुण | | अपेक्षित उत्तर मर्यादा [शब्द] |
|---|---|---|---|---|
| १. | दीर्घोत्तरी | १३ | | ३०० |
| किंवा | | | | |
| १. | | १३ | | ३०० |
| २. | | १३ | | ३०० |
| किंवा | | | | |
| २. | | [illegible] | | ३०० |
| ३. | लघुत्तरी | १२ | पाच पैकी तीन, | प्रत्येकी १०० शब्द. |
| ४. | लघुत्तरी | १२ | पाच पैकी तीन | [illegible] |

**विभाग-२ घटक ५ ते ८**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५. | दीर्घोत्तरी | १३ | | ३०० |
| किंवा | | | | |
| ५. | | १३ | | ३०० |
| ६. | दीर्घोत्तरी | १३ | | ३०० |
| किंवा | | | | |
| ६. | | १३ | | ३०० |
| ७. | लघुत्तरी | १२ | पाच पैकी तीन | प्रत्येकी १०० |
| ८. | लघुत्तरी | १२ | पाच पैकी तीन | प्रत्येकी १०० |

**एम.एड. साठी प्रश्नपत्रिकेचा ढाचा.**

पाठ्यक्रम - १ Advanced Educational Philosophy and Sociology.

**घटक - १ ते ४**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | दीर्घोत्तरी | २० | | ४०० |
| १. किंवा | दीर्घोत्तरी | २० | | ४०० |
| २. | दीर्घोत्तरी | २० | | ४०० |
| किंवा | | | | |
| २. | दीर्घोत्तरी | २० | | ४०० |
| ३. | लघुत्तरी | १० | पाच पैकी दोन | १२५ |

**घटक ५ ते ८**

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | दीर्घोत्तरी | २० | ४०० |
| ४. किंवा | दीर्घोत्तरी | २० | ४०० |

...३

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५. | दीर्घोत्तरी | २० | | ५०० शब्द |
| किंवा | | | | |
| ५. | दीर्घोत्तरी | २० | | ५०० |
| ६. | लघुत्तरी | १० | पाच पैकी दोन | १२५ |

वरील प्रमाणेच ढाचा पाठ्यक्रम " Nonformal & Population Education " व " History of Education & Economics of Education " साठी राहील.

---

## प्रश्नावली

१] अध्यापनाच्या कार्यासाठी आपण स्वभावत: योग्य आहोत असे तुम्हाला वाटते का? होय । नाही

२] अध्यापन कार्यात तुम्हाला आनंद वाटतो का? होय । नाही

३] अध्यापन या व्यवसायाचा तुम्हाला सार्थ अभिमान वाटतो का? होय । नाही

४] अध्यापन हा एक आदर्श व्यवसाय आहे असे तुम्हाला वाटते का? होय । नाही.

५] अध्यापनाचा व्यवसाय मिळाला म्हणून आपण स्वत:ला भाग्यशाली समजता का? होय । नाही

६] तुम्हाला संधी मिळाली तर आता मिळत असलेल्या वेतनावर दुसरा एखादा व्यवसाय स्वीकारणे तुम्ही पसंत कराल का? होय । नाही

७] चांगले काम केल्याबद्दल संस्थेकडून तुम्हाला योग्य मोबदला मिळतो असे तुम्हाला वाटते का? होय । नाही

८] आपल्याला कामाच्या प्रमाणात योग्य वेतन मिळते असे तुम्हाला वाटते का?.

९] अध्यापन-व्यवसायात मिळणा-या पदोन्नती [बढती] च्या संधी बाबत तुम्ही समाधानी आहात का?. होय । नाही

१०] अध्यापन-व्यवसायात तुमचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने मिळणा-या संधीबाबत तुम्ही समाधानी आहात का? होय । नाही

११] आपल्याला योग्यवेळी पदोन्नती [बढती] मिळेल या बाबत तुम्ही निश्चिंत आहात का? होय । नाही

१२] आपल्या संस्थेत प्रत्येकाच्या योग्यतेनुसारच पदोन्नती [बढती] दिली जाते या विधानाशी तुम्ही सहमत आहात का?. होय । नाही

१३] आपला व्यवसाय पूर्णत: सुरक्षित आहे असे तुम्हाला वाटते का? होय । नाही

१४] सेवा [Service ] संबंधीच्या प्रचलित अटी व नियमांच्या बाबतीत तुम्ही संतुष्ट आहात का? होय । नाही

१५] तुमची संस्था शिक्षकोन्मुखी [Teacher-oriented ] असे तुम्हाला वाटते का?. होय । नाही.

१६] संस्थेच्या कामकाजात तुम्हाला सल्ला देण्याची व मते मांडण्याची वेळोवेळी संधी दिली जाते असे तुम्हाला वाटते का? होय । नाही

१७] संस्थेच्या नियोजन व धोरणाबाबत असहमती अथवा विरोध प्रकट करण्याचे स्वातंत्र्य तुम्हाला आहे का?. होय । नाही

१८] तुम्ही तुमच्या संस्थेच्या सर्वसाधारण कामकाजाविषयी समाधानी आहात का?. होय । नाही

१९] तुमची शैक्षणिक योग्यता । व्यावसायिक योग्यता । पात्रता वाढविण्याच्या दृष्टीने संस्थेकडून दिल्या जाणा-या संधीबाबत तुम्ही संतुष्ट आहात का? होय । नाही

२०] आपली संस्था अध्यापनाचे कार्य करण्याच्या दृष्टीने एक उत्कृष्ठ स्थान आहे असे तुम्हाला वाटते का? होय । नाही

..२

२१] तुम्हाला तुमच्या संस्थेचा सार्थ अभिमान वाटतो का? होय । नाही

२२] तुमचे संस्था प्रमुख एक निष्पक्ष व्यक्ति आहेत असे तुम्हाला वाटते का? होय । नाही

२३] तुमचे संस्था प्रमुख आपल्या पदासाठी योग्य । लायक आहेत असे तुम्हाला वाटते का? होय । नाही

२४] तुमचे संस्था प्रमुख तुमच्या चांगल्यासाठी धडपडतात असे तुम्हाला वाटते का? होय । नाही

२५] आपण एखादे काम केले असता संस्था प्रमुख त्या कामाबद्दल आपली प्रशंसा करतात असे तुमच्या अनुभवास येते का? होय । नाही

२६] संस्था प्रमुख संस्थेचे कामकाज ज्या पध्दतीने करतात त्याबाबत तुम्ही संतुष्ट आहात का? होय । नाही

२७] एक अधिकारी व्यक्ति म्हणून संस्था प्रमुखांबाबत तुम्ही संतुष्ट आहात का? होय । नाही

२८] शिक्षकांच्या समस्या [शिक्षकांचे प्रश्न] सोडविण्यासाठी संस्थेने अवलंबिलेल्या कार्यपध्दतीबाबत तुम्ही संतुष्ट आहात का? होय । नाही

२९] आपली संस्था आपले शोषण करते असे तुमच्या अनुभवास येते का? होय । नाही

## कृपया पुढील माहिती भरा

१] पुरुष । स्त्री

२] वय [वर्षात]

३] विवाहित । अविवाहित

४] शै. पात्रता

५] शिकविण्याचा अनुभव [वर्षात]

## *: सूचना :-

या प्रश्नावलीतील प्रत्येक प्रश्नाचे उत्तर "होय" किंवा "नाही" मध्ये द्यावयाचे आहे. जर तुम्हाला एखाद्या प्रश्नाचे उत्तर "होय" मध्ये द्यावयाचे असेल तर "होय" या शब्दाभोवती गोल करा. जर तुम्हाला प्रश्नाचे उत्तर "नाही" मध्ये द्यावयाचे असल्यास "नाही" भोवती गोल करा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर आपण स्वतःच्या मताप्रमाणे द्यावयाचे आहे म्हणून प्रत्येक प्रश्न काळजी पूर्वक वाचा व त्या प्रश्नाचे उत्तर स्पष्टपणे नोंदवा. या माहितीचा उपयोग केवळ संशोधनाच्या कामासाठीच केला जाणार आहे.

आपल्या सहकार्याबद्दल आभारी आहोत.

<u>गुणदान योजना</u> – प्रश्न ६ व २९ यांना "नाही" प्रतिसाद असला तर त्याला "१" गुण द्यावा. "आहे" प्रतिसाद दिल्यास "शून्य" गुण बाकीच्या प्रश्नांना "आहे" प्रतिसाद दिल्यास प्रत्येकी "१" गुण व " नाही" प्रतिसादास शून्य गुण